www.dainikhindusthan.com
हिंदुस्थान

सराफा बाजार
सोने १० ग्रॅम
३१,९००.००
चांदी किलो
४१,५००.००

मुद्रा बाजार
अमेरिकन डॉलर
७३.७६ रुपये

शेअर बाजार
बीएसई
३४.३१५.६३
निफ्टी
१०,३०३.५५

मुख्यमंत्र्यांचं मौनत्व

सत्तेच्या खुर्चीवरून विकास कामांचा उदोउदो करतांना उरलेल्या प्रश्नांकडेही लक्ष देण्याची गरज असते. परंतु भाजप सरकार प्रश्नांना टाळत असल्याचे सद्यचित्र आहे. म्हणूनच अमरावती दौऱ्यावर आलेल्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आढावा बैठकीनंतर शेती संदर्भातील प्रश्नांना सपशेल पाठ दिली. अपूर्ण सिंचन प्रकल्प, शेतमाल खरेदीचा प्रश्न आदी प्रश्नांची उत्तरे देण्यात त्यांना स्वारस्यच नव्हते. पत्रपरिषदेत ज्वलंत व शेतकऱ्यांची निगडीत प्रश्न उपस्थित होताच त्यांनी सोयीस्कर मौन पाळलं. शेतकरी व शेतीची अवस्था अत्यंत बिकट अशी झाली आहे. हमीभाव जाहीर होवूनही त्या भावाने खरेदी होत नाही. शासकीय केंद्रावर शेतमाल खरेदी सुरु नसल्याने काँग्रेसने जिल्हाधिकाऱ्यांच्या दालनात ठिय्या दिला. परंतु प्रश्न निकाली निघाला नाही. केवळ आश्वासनांनाद्वारे बोळवण होत आहे. निसर्गाच्या अवकृपेने जिल्ह्यातील शेतीची अवस्था अत्यंत वाईट आहे. सोयाबीन पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. रब्बी पिके देखील धोक्यात आहेत. भारनियमनामुळे शेतकऱ्यांपुढे सिंचनाचा गंभीर प्रश्न आहे. धरणांमध्ये पाणीसाठा नाही. शेतमाल खरेदी होत नसून व हमीभाव नाही. असा प्रश्नांचा हाहाकार असतांना मुख्यमंत्र्यांनी केवळ शहरी भागातील विकास कामांचे पोवाडे गावून अन्य महत्वाच्या प्रश्नांना पाठ देणे संयुक्तीक नाही. राज्याचे नेतृत्व या नात्याने यांनी प्रश्नांबाबत बोलणे गरजेचे होते. मात्र ते मौन राहीले. सरकारच्या तिजोरीत पैसा नाही.

सत्तेत आल्यापासून सरकारने शेती व शेतकऱ्यांसाठी धोरणात्मक व आमूलाग्र बदल व्हावे असा निर्णय व त्याची अंमलबजावणी केली नाही. त्यामुळे व्यवस्था तीच असल्याने प्रश्नही तेच आहे.

रडार
• शैलेश धुंदी •

विरोधी बाकावर बसतांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तेव्हा सोयाबीनला ६ हजार रूपये हमी भाव देण्याची मागणी केली होती. तत्कालीन काँग्रेस आघाडी सरकारवर आरोप करतांना त्यांनी सोयाबीन व अन्य शेतमाल खरेदीसाठी टीकेची झोड उठविली होती. विरोधात असतांना सोयाबीनसाठी ६ हजार रूपयाने खरेदीची मागणी करणाऱ्या मुख्यमंत्र्यांना त्यांच्या कार्यकाळात सोयाबीनला हमीभाव देखील देता येत नाही,ही शोकांतिका आहे. म्हणजेच आरोप करून सत्ता गाठायची परंतु ती मिळताच प्रश्नांच्या सोडवणूकीस पाठ द्यायची असाच याचा अर्थ होतो. अमरावती येथे आढावा बैठकीनंतर मुख्यमंत्र्यांची हीच पद्धत होती. मुख्यमंत्र्यांच्या आढावा बैठकीनंतर झालेल्या पत्रपरिषदेत केवळ सरकारचे उपक्रम व जलयुक्त शिवारचे कौतुक होते. प्रत्यक्षात ग्रामीण भागातील उपाययोजना व प्रश्नांचा त्यात समावेश नव्हता. कृषी आधारित अर्थव्यवस्था असतांना मुख्यमंत्र्यांनी कृषी व ग्रामीण भागातील प्रश्नांकडे दुर्लक्ष केले. सध्या जिल्ह्यात भारनियमनाचा प्रश्न पेटला आहे. वीजेचे उत्पादन घटल्याने ग्रामीण भागात भारनियमन सुरु झाले आहे. परिणामी सिंचनावर याचा विपरित परिणाम पडत आहे. रब्बी व संत्र्यासाठी ओलीताची गरज आहे. भारनियमन सुरु झाल्याने शेतकऱ्यांपुढे गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. भारनियमनामुळे पिकांचे नुकसान होण्याची दाट शक्यता आहे. सिंचन प्रकल्प अपूर्ण आहेत. त्यांना गती देण्यासाठी आता प्रशासकीय पातळीवर *(पान २ वर)*

राजापेठ रेल्वे उड्डाणपुलाच्या कामाची आ.देशमुख व डॉ.बोंडेकडून पाहणी

भुयारी मार्गाच्या शासकीय मान्यतेसाठी सोमवारी बैठक

राजापेठ रेल्वे उड्डाणपुलाच्या कामाची पाहणी करतांना आ.डॉ.सुनिल देशमुख, आ.डॉ.अनिल बोंडे व इतर उपस्थित मान्यवर.

अमरावती दि.१९ : राजापेठ रेल्वे क्रॉसिंगवरील उड्डाणपुलाच्या कामाची आ.डॉ.सुनिल देशमुख व आ.डॉ.अनिल बोंडे यांनी शुक्रवार दि.१९ रोजी पाहणी केली. यावेळी भुयारी मार्गाला लवकरात लवकर शासकीय मान्यता मिळवून देण्याच्या दृष्टीने सोमवारी मंत्रालयात बैठक बोलविण्यात येणार असल्याचे आ.डॉ.सुनिल देशमुख यांनी यावेळी सांगितले.

शहरातील अत्यंत वर्दळीच्या भागात निर्माणाधिन असलेल्या राजापेठ रेल्वे उड्डाण पुल व भुयारी मार्गाचे काम *(उर्वरित पान २ वर)*

राजापेठ उड्डाणपुल तांत्रिकदृष्ट्या चूकीचा

आ. रवी राणांचा नाहक अट्टहास : शिवराय कुळकर्णी यांची पत्रपरिषद : राणा निष्पापांच्या जीवाशी खेळत असल्याचा आरोप

पत्रपरिषदेला उपस्थित शिवराय कुळकर्णी व अन्य.

अमरावती,दि.१९(प्रतिनिधी): वाहतुकीची कोंडी फोडण्यासाठी निर्माणाधिन अवस्थेत असलेल्या राजापेठ उड्डाणपुलास विरोध सुरु झाला आहे. हा पूल तांत्रिकदृष्ट्या चूकीचा असून त्यामुळे भविष्यात मोठ्या प्रमाणात हानी होण्याची शक्यता असल्याचे भाजप प्रदेश प्रवक्ते शिवराय कुळकर्णी यांनी म्हटले आहे. आमदार रवी राणा त्यांच्या अट्टहासाकरिता जनतेला व अमरावतीकरांना वेठीस धरत असल्याचा आरोप शिवराय कुळकर्णी यांनी केला आहे.

स्थानीक राजापेठ येथील अमरावती श्रमिक पत्रकार भवन येथे आयोजित पत्रपरिषदेत शिवराय कुळकर्णी यांनी राजापेठ उड्डाणपुल तांत्रिकदृष्ट्या चूकीचा असून पुलाची बेलपुरा, शंकर नगर भागाकडे जाणारे मार्ग रद्द करण्यात यावी अशी मागणी केली. सदर परिसराकडे पूल उतरत असतांना त्यांची रूंदी केवळ ६ मीटर आहे. एवढ्या अरूंद पुलावरून येणारे-जाणारे दोन्ही प्रकारच्या वाहतुकीला अडथळा निर्माण होणार आहे. याच पुलाच्या बडनेरा मार्गावर वाहतुकीस अडथळा होत आहे. दोन मोठी वाहने एकाचवेळी समोर *(उर्वरित पान २ वर)*

पक्षाने उमेदवारी दिल्यास लढणार

आगामी विधानसभा निवडणूकीत पक्षाने आपणास उमेदवारी दिल्यास आपण निश्चितपणे बडनेरा विधानसभा मतदार संघाची निवडणूक लढणार असल्याचे शिवराय कुळकर्णी यांनी एका प्रश्नाच्या उत्तरात सांगितले. राणांनी बडनेरा मतदार संघ भकास केला आहे. मतदार संघातील ग्रामीण भागात दयनीय अवस्था आहे. त्यांचे कार्यकर्ते नाहक श्रेय लाटण्याचा प्रयत्न करतात. अमरावतीत पाय ठेवताच विकास दिसतो, परंतु बडनेरा मतदार संघ भकास झाल्याचा आरोप शिवराय कुळकर्णी यांनी केला.

गोवारी समाजाचा विशाल मोर्चा

जिल्हाधिकारी कार्यालयावर निघालेला गोवारी समाज बांधवांचा विशाल मोर्चा

अमरावती,दि.१९ : गोवारी समाजाच्या विविध प्रश्नांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी आदिवासी गोवारी जमात संघटन समत्वय समितीच्या वतीने शुक्रवारी (ता.१९) जिल्हाधिकारी कार्यालयावर गोवारी समाज बांधवांनी मोर्चा काढला.

स्थानीक इर्वीन चौक येथून हा मोर्चा दुपारी एक वाजताचे सुमारास निघाला. मोर्चामध्ये महिला,पुरुष व युवक, युवतींनीची लक्षणीय उपस्थिती होती. जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा धडकल्यानंतर पिवळ्या रंगाची वेशभूषा परिधान केलेल्या पाच युवतींनी जिल्हाधिकाऱ्यांना मागण्यांचे निवेदन दिले. १९५६ पासून गोवारी जमात अनुसूचित जमातीच्या यादीत समाविष्ट आहे. परंतु यादी करतांना चुकीने गोंडगोवारी अशी नोंद करण्यात आली आहे. शासनाने केलेल्या या चुकीमुळे गोवारी जमातीला अनुसूचित जमातीच्या सवलतीपासून वंचित ठेवण्यात येत आहे. परंतु १४ ऑगस्ट २०१८ रोजी मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपुर खंडपीठाने यावर महत्वपूर्ण आदेश दिला आहे. यामुळे उच्च न्यायालयाच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी, असे निवेदनात नमूद करण्यात आले. आंदोलनात संघटनेचे पुंडलिकराव चामलोट, मंगेश चौधरी, मोहन राऊत, सिद्धेश्वर नेवारे, कृष्णा चौधरी, शरद अंबाडारे, उकंडराव नेवारे, प्रफुल्ल ठाकरे, विष्णू राऊत, वसंतराव अंबाडेकर, मारोती वाघाडे, उकंडराव काळसर्पे, दुधकवर, डेंडूजी रा त, हेमराव नेवारे, मारोतराव वाघाडे, देवीदास बासकवरे, सुदर्शन चामलोट, मारोराव वाघाडे आदी सहभागी झाले होते.

फिशरीज हब व फिश मार्केटच्या २१.८२ कोटींच्या खर्चास प्रशासकीय मान्यता

आ.डॉ.सुनील देशमुख यांच्या प्रयत्नांना यश

अमरावती दि. १९ : जिल्ह्यातील मत्सव्यवसायीक व मासेमारांकरिता अंत्यत महत्त्वपूर्ण असलेल्या फिशरीज हब व फिश मार्केट उभारण्याची संकल्पना आ. डॉ. सुनिल देशमूख यांनी मांडली होती. त्याकरीता महानगर पालिकेचा हिस्सा म्हणून २० कोटी रू. शासनाने एक वर्षा पूर्विच मंजूर केले होते. याच्या सुधारित प्रकल्प अहवालानूसार २१.८२ कोटी रू. खर्चाला शासनाने नुकतीच प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे. त्यामुळे अमरावती येथे आधूनिक फिशरीज हब व फिश मार्केटच्या निर्मितीचा मार्ग प्रशस्त झाला असून आ.डॉ.सुनिल देशमूख यांच्या सातत्य पूर्ण पाठपूराव्यास यश मिळाले आहे.

आ.डॉ. सुनिल देशमुख यांचे संकल्पनेतून अमरावती महानगर पालिकेने अमरावती येथे आधुनिक फिशरी हब व शुक्रवारी बाजार येथे फिश मार्केट तयार करण्या करिता शासनास विनंती केली होती. त्यानुसार महाराष्ट्र मत्स उद्योग महामंडळास नोडल एजन्सी म्हणून मान्यता देण्यात आली होती. त्या अनुषंगाने अमरावती महानगर पालिका व मत्स उद्योग महामंडळ यांच्या मध्ये दि. १ जानेवारी २०१६ रोजी करार करण्यात आला होता. त्याअनुषंगाने प्राथमिक स्वरूपात ६० टक्के केंद्र शासन व ४० टक्के महानगर पालिका असा संयुक्त भागीदारीतून प्रकल्पाकरिता ३८.४५ कोटीचा रुपयांचा प्रकल्प अहवाल सादर करण्यात आला होता. याकरिता आ.डॉ.सुनिल देशमुख यांनी महानगर पालिकेच्या हिश्यापोटी २० कोटी रूपयांची तरतूद महाराष्ट्र शासनाने करावी अशी मागणी मा.मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस व अर्थमंत्री श्री. सुधिरजी मुनगंटीवार यांना केली होती. त्याला अनुसरून नगरविकास विभागाने महापालिका क्षेत्रात मुलभूत सोयी सूविधांच्या विकासासाठी विशेष तरतूद या योजने अंतर्गत फिशरीज हब व फिश मार्केट प्रकल्पाकरिता २० कोटी रू. निधी मंजूर करण्यात आला होता. तदनंतर केंद्र शासनाच्या निल क्रांती योजने अंतर्गत बदललेल्या धोरणानूसार महाराष्ट्र मत्स्योद्योग विकास महामंडळाने २१.८२ कोटी रकमेचा सूधारित प्रकल्प अहवाल सादर केला आहे. अमरावती येथील फिशरीज हब निर्मितीच्या कामात घावूक व किरकोळ बाजारपेठ अंतर्गत ३० घावूक स्टॉल, *(पान २ वर)*

मनपाची अभ्यासिका स्पर्धा परिक्षेच्या विद्यार्थ्यांकरीता ठरतोय दिपस्तंभ

मनपाच्या अभ्यासिकेतील तीन विद्यार्थ्यांची वर्ग २ पदावर निवड

अमरावती दि.१९ : महानगर पालिका व बाल विकास विभागव्दारा संचालित स्पर्धा परिक्षा/ग्रंथालय/अभ्यासिका केंद्र अमरावती शहरातील विद्यार्थ्यांकरीता दिपस्तंभ ठरत आहे. या अभ्यासिकेतील तिन विद्यार्थ्यांची शासकीय सेवेत वर्ग २ पदी नुकतीच निवड झालेली आहे.

या अभ्यासिकेतील नयुम कादर शाह व मयुर मधुकर धाकडे यांची अकोला जिल्हा न्यायालय येथे तर अतुल काळे यांची महाबिज अकोला येथे लघुलेखक पदावर निवड झालेली आहे. या विद्यार्थ्यांनी सरळसेवा भरती अंतर्गत घेण्यात आलेल्या पदभरती परिक्षेत यश प्राप्त केलेले असून,त्यांची लघुलेखक वर्ग २ या पदावर नियुक्ती करण्यात आलेली आहे. मनपा उपायुक्त नरेंद्र वानखडे यांनी पुढाकार घेवून काही वर्षापुर्वी स्पर्धा परिक्षा क्षेत्रात करियर करू ईच्छिणाऱ्या शहरातील गरीब,होतकरू विद्यार्थ्यांकरीता मनपाने शहराच्या मध्यभागी स्पर्धा परिक्षा ग्रंथालय/अभ्यासिका केंद्राची निर्मिती केलेली आहे. अमरावती महानगर पालिकेचा हा राज्यातील नाविण्यपुर्ण उपक्रम ठरलेला आहे. तेव्हापासून शेकडो विद्यार्थी या केंद्राचा लाभ घेवून शासकीय सेवेत विविध पदावर रुजू झालेले आहेत.

यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन करतांना मनपा उपायुक्त नरेंद्र वानखडे, शिक्षणाधिकारी अनिल कोल्हे.

महानगर पालिकेने हे स्पर्धा परिक्षा केंद्र गेल्या काही वर्षापासूनच सुरू केले असून, त्याला प्रचंड असा प्रतिसाद मिळत आहे. शासनाच्या विविध स्पर्धा परिक्षेची तयारी करण्याकरीता आवश्यक ती पुस्तके विद्यार्थ्यांना *(उर्वरित पान २ वर)*